
ISO9001:2008 मानांकित
फोन नं.-०२५८९.२८६०२३
मेहुणबारे पोलीस स्टेशन

**MEHUNBARE POLICE STATION MEHUNBARE POLICE STATION**
मेहुणबारे पोलीस स्टेशन ता.चाळीसगाव जि.जळगाव LANDLINENO.-०२५८९-२८६०२३
E-MAILID-Mehunbaraps@gmail.com

---

**प्रेस नोट**

दि. 04/03/2026

प्रति,

सर्व संपादक,
दैनिक वृत्तपत्र, साप्ताहीक, मासिक

**विषय - अपघाताचा बनाव करुन कट रचून सरपंच व उप सरपंच यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न उघडकीस आणून आरोपींना मेहुणबारे पोलीसांकडून अटक.**

दिनांक 25/02/2026 रोजी मेहुणबारे पोलीस स्टेशन येथे फिर्यादी नामे ईश्वर ऊर्फ भैय्या लक्ष्मण अहिरे (उपसरपंच) रा. दस्केबर्डी ता. चाळीसगांव यांचे तक्रारीवरुन गुरक्र. ४२/२०२६ बी एन एस कलम २८१, १२५ (अ), १२५ (ब), ३२४ (२), १८४, १३४ (अ),१३४ (ब) प्रमाणे रोड अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. नमुद गुन्हयातील फिर्यादी ईश्वर ऊर्फ भैय्या लक्ष्मण अहिरे (उपसरपंच दस्केबर्डी ) व भगवान उत्तम देवरे (सरपंच दस्केबर्डी) यांना गावातील राजकीय वैमनस्यातुन दिनांक 26/01/2026 रोजी रात्रीचे वेळी ते त्यांचेकडील बुलेट मोटर सायकल ने चाळीसगांव येथून दस्केबर्डी येथे जात असताना शिदवाडी शिवारात मेहुणबारे ते शिदवाडी रस्त्यावर समोरुन येणा-या पिकअप वाहनाने जोराची धडक दिली. त्यावेळी ते दोघे खाली पडून भगवान उत्तम देवरे (सरपंच दस्केबर्डी) हे गंभीर जखमी झाले होते. यातील फिर्यादी यांनी सदर चा प्रकार हा अपघात नसून घातपात असलेबाबत संशय व्यक्त केला होता.

फिर्यादी यांनी घातपाताचा संशय व्यक्त केल्याने जिल्हा पोलीस अधिक्षक मा. डॉ. श्री महेश्वर रेडडी सो, अपर पोलीस अधिक्षक, चाळीसगांव मा. श्रीमती कविता नेरकर मॅडम व उपविभागीय पोलीस अधिकारी, चाळीसगांव उप विभाग मा. श्री विजयकुमार ठाकुरवाड सो, यांनी दिलेल्या सूचना व मार्गदर्शनाप्रमाणे प्रभारी अधिकारी श्री प्रवीण दातरे सहायक पोलीस निरीक्षक यांनी गुन्ह्याचे तपासी अधिकारी पोलीस उप निरीक्षक सुहास आव्हाड व अंमलदार यांना गुन्हा उघडकीस आणने बाबत योग्य त्या सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे तपासी अधिकारी व अंमलदार यांनी सी.सी.टी.व्ही फुटेज व तांत्रीक तपास करुन फिर्यादी यांचे बुलेट मोटार सायकलीस धडक देवुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणा-या पिकअप वाहन मालकास पिकअप वाहनासह ताब्यात घेतले. त्यानंतर पिकअप वाहन मालकाकडे कौशल्याने तपास केला असता असे उघडकीस आले की, फिर्यादी व जखमी साक्षीदार हे गावाचे सरपंच व उपसपंच असुन त्यांचे दस्केबर्डी गावामध्ये राजकीय मतभेद असल्याने गावातील

आरोपी 1 भिमराव पांडुरंग रोकडे 2) सचिन भिमराव रोकडे 3) गोविंदा विठोबा माळी व 4) लक्ष्मण अशोक महाजन रा. वाडे ता. भडगांव (पिकअप वाहन मालक) यांनी कट रचुन अपघाताचा बनाव रचुन ईश्वर ऊर्फ भैय्या लक्ष्मण अहिरे (उपसरपंच दस्केबर्डी ) व भगवान उत्तम देवरे (सरपंच दस्केबर्डी) यांना पिकअप वाहनाने समोरुन धडक देवुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचे उघड झाल्याने नमुद गुन्हयास लावण्यात आलेले अपघातचे कलमे कमी करुन फौजदारीपात्र कट रचून खुनाचा प्रयत्न केले बाबत कलमे लावण्यात आलेली आहेत. नमुद गुन्ह्यामध्ये एकुण 04 आरोपी अटक करण्यात आले असुन अपघातात वापरण्यात आलेले पिकअप वाहन जप्त करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. वरिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी श्री प्रविण अ. दातरे, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उप-निरीक्षक श्री सुहास आव्हाड, पोलीस उप-निरीक्षक श्री विकास शिरोळे, पोहेकॉ किशोर पाटील, पोहेकॉ शांताराम पवार, पोहेकॉ सचिन निकम, पोना योगेश पाटील, पोकॉ विनोद बेलदार, पोकॉ संजय लाटे, यांनी केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक सुहास आव्हाड व पोकॉ संजय लाटे करीत आहेत.

प्रविण अ. दातरे
सहा. पोलीस निरीक्षक
मेहूणबारे पोलीस स्टेशन